नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - २ Issue - 2 | वार - बुधवार दि. २७ मे २०२६ Blow- Wednesday Date 27 May 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# ८९ हजार कोटींच्या ५ प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन

## २० हजार रोजगार निर्माण होणार; मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंजुरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सुमारे ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे २० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी सांगितले. राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना विविध सवलती व प्रोत्साहने देण्यात येतात. त्याअंतर्गत नवीन उद्योग स्थापन होऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित व्हावी, रोजगार वाढावा आणि औद्योगिक परिसंस्था निर्माण व्हावी, यासाठी विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष सवलती देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. या उपसमितीची बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासु यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत कोल गॅसिफिकेशन अँण्ड डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटिव्ह्ज, सोलर सेल मॉड्युल, इग्नॉट, वेफर्स पॅनेल, इलेक्ट्रिक स्टील, पेट टायर कॉर्ड तसेच सिंथेटिक ग्रॅफाइट अँनोड मटेरियल यांसारख्या उच्च तंत्रज्ञानाधारित आणि भविष्यकालीन उद्योग क्षेत्रांतील पाच प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली. या सर्व प्रकल्पांमुळे राज्यात उच्च तंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राचा विस्तार होण्यास मदत होणार आहे.

या विशाल प्रकल्पांमुळे गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीसह स्थानिक स्तरावर व्यावसायिक उपक्रम, पूरक उद्योग आणि पुरवठा साखळीही विकसित होणार आहे. तांत्रिक नवकल्पना, संशोधन व विकासाला चालना मिळून लघु व मध्यम उद्योगांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच स्थानिक युवकांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण होऊन उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

## केंद्रीय आरोग्य विभागाकडून उजनीच्या पाण्याची तपासणी करण्यात येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी



सोलापूर जिल्ह्यात वर्गणी ठरलेल्या उजनी धरणाला ४५ वर्षे पूर्ण झाले आहेत. त्यामुळे केंद्र शासनाच्या धरून अधिनियम २२५ अंतर्गत उजनी धरणाची तपासणी ऑडिट पुढील महिन्यापासून सुरू करण्यात येणार आहे.

भीमा नदीवर १९८० साली उजनी धरण उजनी धरण बांधण्यात आले उजनी धरणाला ४५ वर्षे पूर्ण झाली आहे. उजनी धरणातील शेतीसाठी व पिण्यासाठी पाणी सोडण्यात येते. त्यामुळे उजनी धरण दुष्काळी असलेले सोलापूर जिल्ह्यामध्ये वर्धायणी ठरल्याचे दिसून येत आहे. उजनी धरणाला ४५ वर्षे पूर्ण झाली आहे. केंद्र शासनाच्या धरण सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत वहिनी धनाची तपासणी करण्यात येणार आहे. यासाठी खास केंद्रीय पथक येणार असून. पथक ड्रोन व डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर . चपातीसाठी करण्यात येणार आहे. मातीचा बांध सांड्या, कालीन दरवाजे विद्युत यंत्रणा, भूकंप पतिरोधक समता यांची तपासणी करण्यात येणार आहे.

# कांदा उत्पादकांना वाऱ्यावर सोडणार नाही!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केंद्र आणि राज्य सरकार पूर्णपणे संवेदनशील असून, केंद्रीय सहकार व गृहमंत्री अमित शाह यांनी बोलावलेल्या बैठकीत निश्चितच सकारात्मक तोडगा निघेल, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. मुंबई येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले.शिंदे म्हणाले की, राज्य सरकार आणि केंद्र सरकारने कांदा खरेदी केंद्रे सुरू केली असून सध्या १५ रुपये ८० पैसे प्रति किलो या दराने कांदा खरेदी केली जात आहे. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत वाऱ्यावर सोडले जाणार नाही. त्यांच्या हितासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी सरकारला पूर्णपणे



माहीत आहेत. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकार समन्वयाने काम करत आहे. उद्या होणाऱ्या बैठकीत अमित शाह यांच्याकडून यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळेल,असे शिंदे म्हणाले.विरोधकांच्या आंदोलनांवर टीका करताना त्यांनी म्हटले की, विरोधकांकडे आता कोणतेही ठोस मुद्दे उरलेले नाहीत. त्यामुळे केवळ प्रसिद्धीसाठी आणि मीडियात झळकण्यासाठी आंदोलनांचा आधार घेतला जात आहे.

ही शेतकऱ्यांच्या हिताची लढाई नसून निव्वळ स्टंटबाजी आहे. यूपीए सरकारच्या काळाची आठवण करून देताना शिंदे म्हणाले की, काँग्रेसच्या सत्ताकाळातही कांद्याने जनतेला रडवले होते. त्या वेळी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रभावी पावले उचलली गेली

### अमित शाहांच्या बैठकीत सकारात्मक तोडगा निघेल : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

नव्हती. आज मात्र केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे.कांदा उत्पादकांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असून, कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही, अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

# कारचा भीषण अपघात; चौघांचा जागीच मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लखनऊ: आंबेनळी घाटात कार अपघातात ८ मित्रांचा अपघात झाल्याची घटना ताजी असताना उत्तर प्रदेशातील सुलतानपूर-लखनऊ महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. कैंची धामला निघालेल्या मित्रांची इनोव्हा कार भरधाव वेगातील ट्रेलरला धडकली. धडक इतकी भीषण होती की कारच्या पुढील भागाचा अक्षरश: चक्काचूर झाला. आत बसलेल्या मित्रांना आक्रोशदेखील करता आला नाही. काही कळायच्या आत त्यांचा जीव गेला होता. या अपघातात ४ तरुणांचा जागीच शेवट झाला. तर अन्य तिघांचा मृत्यूशी संघर्ष सुरू आहे.

बाराबंकी जिल्ह्यातील हैदरगढ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या भिखरा गावाजवळ मध्यरात्री पावणे तीनच्या सुमारास कारला अपघात झाला. रात्रीच्या अंधारात मोठा आवाज ऐकू आल्यानं आसपासचे लोक घाबरले. त्यांनी घराबाहेर धाव घेतली. महामार्गावर पोहोचताच त्यांच्या अंगावर काटा आला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, भरधाव वेगातील इनोव्हा कार सुलतानपूरहून लखनऊच्या दिशेनं जात होती. त्याच सुमारास तिनं पुढे असलेल्या ट्रेलरला धडक दिली. धडक अतिशय भीषण होती. अपघातात इनोव्हाचं मोठं नुकसान झालं. कारचा पुढील भाग पूर्णपणे दाबला गेला. आत बसलेले तरुण अडकले. अपघातानंतर आक्रोश, आरडाओरड सुरू झाली. स्थानिकांनी अपघाताची माहिती पोलिसांना दिली. यानंतर पोलीस अपघातस्थळी पोहोचले. मदत आणि बचाव कार्य सुरू झालं.

इनोव्हा कारमध्ये सगळे जण कैंची धामला दर्शनासाठी जात होते. अतिशय आनंदात, उत्साहात त्यांचा प्रवास सुरू होता. कारमध्ये एकूण ७ तरुण होते. पैकी चौघांचा मृत्यू झाला. राहुल कुमार, राहुल सिंह, सत्यम सिंह, सूरज यादव अशी मृतांची नावं आहेत. चौघांच्या मृत्यूची बातमी त्यांच्या कुटुंबापर्यंत पोहोचवण्यात आली. यानंतर त्यांच्या घरावर दु:खाचा डोंगर कोसळला. या अपघातात पंकज, प्रशांत आणि चंदन सिंह गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना आधी सार्वजनिक आरोग्य केंद्र हैदरगढ येथे नेण्यात आलं. तिथे त्यांच्यावर प्रथमोपचार करण्यात आले. त्यांची नाजूक अवस्था पाहता त्यांना किंग जॉर्ज वैद्यकीय विद्यापीठाच्या ट्रॉमा सेंटरमध्ये दाखल करण्यात आली आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचं सांगितलं जात आहे.

### आमदारांच्या बैठकीत सुनेत्रा पवारांची नाराजी, सूत्रांची माहिती

# सात दिवसात अर्थखाते राष्ट्रवादीला देणार होते, मात्र दोन महिन्यानंतरही निर्णय नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर सात दिवसांत अर्थखातं पुन्हा राष्ट्रवादीला देण्याबाबत भाजपकडून आश्वासन देण्यात आलं होतं, परंतु सतत विषय काढूनही ते खातं अद्याप देण्यात आलं नसल्याची खंत राष्ट्रावादीच्या नेत्या आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केल्याची माहिती आहे. त्यावेळी माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी नाशिकमधील कुंभमेळ्याच्या कामावरून नाराजी व्यक्त केल्याची देखील माहिती आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या उपस्थितीत देवगिरी निवासस्थानी राष्ट्रवादीची बैठक पार पडली. आमदारांच्या बैठकीत सुनेत्रा पवारांनी अर्थखात्यावरून खंत व्यक्त केली अशी माहिती सूत्रांनी दिली. या आधी अर्थखातं हे अजित पवारांकडे होतं. परंतु त्यांच्या अपघाती निधनानंतर हे खातं स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे आलं. अजित पवारांकडे असलेलं एक्साईज खातं मात्र सुनेत्रा पवारांना देण्यात आलं.

राज्याचा अर्थसंकल्प तोंडावर असताना अर्थखातं हे स्वतः मुख्यमंत्र्यांनी घेतलं होतं. अधिवेशन झाल्यानंतर हे खातं पुन्हा एकदा राष्ट्रवादीला देण्यात येईल असं आश्वासनही देण्यात आलं होतं. मात्र अर्थखात्याबाबत सातत्याने विचारणा करूनदेखील त्यावर मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतला नाही अशी खंत सुनेत्रा पवारांनी आमदारांच्या बैठकीत व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

त्याचवेळी नाशिकमध्ये सुरू असलेल्या कुंभमेळ्याच्या कामावरुन माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. नाशिकमध्ये कुंभमेळ्याची २५ हजार कोटींची कामं सुरू आहेत. मात्र त्यापैकी एकही काम राष्ट्रवादीला देण्यात आलं नसल्याचं सांगत माणिकराव कोकाटे यांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे.

आमदारांच्या बैठकीत सुनेत्रा पवारांनी अर्थखात्यासंबंधी केलेल्या दाव्यामुळे आगामी काळात महायुतीतला वाद आणखी चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### २-३ दिवसांत नावे जाहीर होणार

### विधानपरिषदेच्या प्रश्नावर एकनाथ शिंदेंचा संताप

# विधानपरिषदेच्या १२ जागांसाठी ४८ जणांची नावे; भाजपाध्यक्ष रवींद्र चव्हाण अमित शाहांच्या भेटीला दिल्लीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्यातील विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुकांची घोषणा झाली असून उमेदवारी अर्ज भरण्यासही सुरुवात झाली आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असाच सामना याही निवडणुकीत होत आहे. त्यासाठी, महायुतीमध्ये १२-५-२ असा फॉर्म्युला ठरल्याची चर्चा आहे. त्यामध्ये, भाजप १२, शिंदेंची शिवसेना ५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला १ जागा देण्यात येणार असल्याचे समजते. यासंदर्भात अंतिम निर्णय झाला नसून तिन्ही पक्षाचे प्रमुख एकत्र बैठक घेऊन जागावाटप अंतिम करणार आहेत. मात्र, भाजपने १२ जागांसाठी तयारी सुरू केली असून उमेदवारांच्या नावांची यादीही निश्चित करण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळेच, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आज ४८ नावांची यादी घेऊन दिल्लीला रवाना होत आहेत.

विधान परिषदेच्या उमेदवार निश्चितीसाठी भाजपात हालचालींना वेग आला असून पुढील २ ते ३ दिवसांत उमेदवारांची नावे निश्चित केली जाणार आहेत. त्यासाठी, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आज दिल्लीला रवाना होत आहेत. विधान परिषदेच्या एकूण १२ जागांसाठी ४८ जणांच्या नावांची यादी घेऊन चव्हाण दिल्लीत दाखल होत आहेत. दिल्ली दौऱ्यात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची भेट घेऊन रविंद्र चव्हाण नावांसंदर्भात चर्चा कर आहेत.



विधानपरिषद निवडणुकांचा महायुतीमधील फॉर्म्युला, भाजपच्या उमेदवारांची नावे व इतर बाबींची तपशीलवार माहिती केंद्रीय पक्ष नेतृत्वाला दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, चव्हाण यांच्या दिल्ली दौऱ्यातच भाजपच्या १२ उमेदवारांची नावे निश्चित केली जाणार असून पुढील २ ते ३ दिवसांत भाजप उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. कारण, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी १ जून पर्यंतची मुदत आहे. त्यामुळे, २-३ दिवसांत नावे निश्चित करुन उमेदवारांना तयारीला लागण्याचे आदेशही पक्षाकडून दिले जातील.

विधानपरिषद निवडणुकांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या प्रमुख नेत्यांशी एकनाथ शिंदेंची अनेकदा चर्चा झाली. विशेष म्हणजे, एकनाथ शिंदे यांनी दिल्ली वारी करूनही विधान परिषदेच्या निवडणुकीवर तोडगा निघत नसल्याचं चित्र आहे. त्यामुळेच की काय आज एकनाथ शिंदे हे पत्रकारांच्या प्रश्नावर भडकल्याचं दिसून आलं. विधान परिषदेच्या जागांवर पत्रकारांनी प्रश्न विचारताच, एकनाथ शिंदे चांगलेच संतापले. कुठलं बोलणार... काय आहे? असं म्हणत त्यांचा संताप अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. विधान परिषदेच्या जागावाटपासंदर्भात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात बैठक पार पडली. या बैठकीनंतर एकनाथ शिंदे पत्रकारांसमोर आले खरे, परंतु त्यांना पहिलाच प्रश्न विधान परिषदेच्या बैठकीबाबत केल्याने ते पत्रकारांवर प्रचंड संतापले. त्यांनी पत्रकारांनाच उलट सवाल केला. त्यांची बदललेली देहबोली पाहता, चर्चांना उधाण आलं. त्यामुळं या बैठकीत नेमकं काय घडलं, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## संपादकीय....

# औद्योगिक विकासाला गती

राज्यात गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीला मोठी चालना देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सुमारे ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रकल्पांमुळे राज्यात सुमारे २० हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. परिणामी, विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये हे प्रकल्प उभारले जाणार असून, कोळशापासून वायू ऊर्जा निर्मिती, सोलर सेल मॉड्युलर, वेफर्स पॅनेल आणि इलेक्ट्रिक स्टील अशा अत्याधुनिक आणि ऊर्जा क्षेत्राशी संबंधित उद्योगांचा यात समावेश आहे. राज्यात औद्योगिक विकासाला गती देत हरित ऊर्जा आणि आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्राला अधिक सक्षम करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने अदानी कंपनीसह पाच उद्योग समूहांच्या प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र यांच्या फडणवीस अध्यक्षतेखालील उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मंगळवारी झाली, त्यामध्ये याला मान्यता देण्यात आली. दरम्यान, या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे २० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे फडणवीस यांनी बैठकीनंतर सांगितले. राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना विविध सवलती देण्यात येतात. त्याअंतर्गत नवीन उद्योग स्थापन होऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित व्हावी, रोजगार वाढावा आणि औद्योगिक परिसंस्था निर्माण व्हावी, यासाठी विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष सवलती देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी गट प्रोत्साहन योजनेद्वारे प्रोत्साहन देणाऱ्या राज्याच्या औद्योगिक धोरणांतर्गत या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. यात मेगा आणि अल्ट्रा-मेगा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी, तसेच जलद औद्योगिक विकास आणि रोजगार निर्मिती सुनिश्चित करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती स्थापन करण्यात आली आहे. सरकारने म्हटले आहे की, या प्रकल्पांमुळे विदर्भ, मराठवाडा आणि नाशिकसह इतर भागांना फायदा होईल आणि राज्यभरातील औद्योगिक विकासात संतुलन राखण्यास मदत होईल. थेट रोजगाराव्यतिरिक्त, या प्रकल्पांमुळे सहाय्यक उद्योग, लॉजिस्टिक्स आणि पुरवठा साखळींमध्ये अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

# महाडीबीटी पोर्टलचे काम पूर्ण होताच 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' ऑनलाइन अर्ज प्रक्रियेला सुरुवात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/कमलाकर सोनकांबळे : ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी देत पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे आधुनिक स्वरूप देणारी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबविण्यासाठी पशुसंवर्धन विभाग कटिबद्ध असून, महाआयटीमार्फत 'महाडीबीटी' पोर्टलवर अर्ज स्वीकृतीसाठी सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण होताच इच्छुक लाभार्थ्यांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे.

राज्यातील पशुसंवर्धन व्यवसायाला नवी दिशा देणे तसेच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण भागातील उद्योजकतेला चालना देणारी ही योजना राज्याच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारी ठरणार असून, राज्यातील युवक, शेतकरी आणि पशुपालकांमध्ये या योजनेबाबत मोठा उत्साह दिसून येत आहे.

योजनेची अंमलबजावणी वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे. लाभार्थ्यांना घरबसल्या सहज अर्ज करता यावा यासाठी 'महाडीबीटी' पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी महाआयटीकडे विशेष पोर्टल विकसित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली असून, तांत्रिक टीमकडून हे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

पोर्टलचे काम पूर्ण होताच योजना अधिकृतपणे सुरू झाल्याची सूचना पशुसंवर्धन विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचेही आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

**१९६२ नि:शुल्क क्रमांकावर मार्गदर्शन उपलब्ध**

'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'विषयी अधिकृत माहिती, शंका निरसन किंवा मार्गदर्शनासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी १९६२ या टोल-फ्री कॉल सेंटर क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच, अधिक माहितीसाठी परिसरातील नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# रमाबाई आंबेडकर : संघर्षातील शांत शक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा विचार करताना त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर खंबीरपणे उभ्या राहिलेल्या रमाबाई आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत आदराने आणि कृतज्ञतेने स्मरणात येते. भारतीय समाजव्यवस्थेतील अन्याय, अस्पृश्यता, गरिबी, सामाजिक बहिष्कार आणि मानवी अपमानाच्या काळोखात बाबासाहेबांनी उभी केलेली परिवर्तनाची मशाल तेजाने प्रज्वलित राहिली, त्यामागे रमाबाईंचे त्यागमय जीवन आणि शांत पण समर्थ सहकार्य मोठ्या प्रमाणात कार्यरत होते. बाबासाहेबांच्या आयुष्याचा इतिहास जितका संघर्षाचा आहे, तितकाच तो रमाईंच्या त्यागाचा आणि सहनशीलतेचाही आहे. म्हणूनच २७ मे रोजी येणारा रमाबाई आंबेडकर स्मृतिदिन हा केवळ एका व्यक्तीच्या स्मृतीचा दिवस नसून त्याग, समर्पण, सहनशीलता आणि स्त्रीशक्तीच्या अद्वितीय योगदानाचे स्मरण करणारा दिवस आहे.

रमाबाई आंबेडकर यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी कोकणातील दापोली तालुक्यातील वणंद या गावात झाला. त्यांचे वडील भिकू धुतरे हे अत्यंत गरीब कुटुंबातील मेहनती व्यक्ती होते. लहान वयातच रमाबाईंच्या आयुष्यात दुःखाचे सावट आले. आई-वडिलांचे निधन झाल्यानंतर त्यांचे बालपण अत्यंत हालअपेष्टांत गेले. आर्थिक अडचणी, उपासमार, असुरक्षितता आणि सामाजिक दुर्लक्ष अशा परिस्थितीत त्यांचे बालजीवन घडले. त्या काळात मुलींना शिक्षणाची संधी नव्हतीच; त्यात दलित समाजातील मुलींची अवस्था अधिकच बिकट होती. त्यामुळे रमाबाई औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिल्या. परंतु जीवनाच्या कठोर अनुभवांनी त्यांना प्रगल्भ बनवले.

१९०६ मध्ये अवघ्या नऊ वर्षांच्या रमाबाईंचा विवाह पंधरा वर्षीय भीमराव आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह जरी पारंपरिक पद्धतीने झाला असला तरी पुढे या नात्याने भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान मिळवले. विवाहानंतर रमाबाईंच्या आयुष्यात संघर्ष अधिकच वाढला. बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी झटत होते. त्यांना शिक्षणाची प्रचंड ओढ होती आणि त्यासाठी आर्थिक संकटांशी सतत लढावे लागत होते. अशा वेळी रमाबाई यांनी संसाराचा संपूर्ण भार स्वतःच्या खांद्यावर घेतला. अत्यंत गरिबीत संसार चालवताना त्यांनी कधीही तक्रार केली नाही. बाबासाहेबांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी त्यांनी स्वतःच्या इच्छा-आकांक्षांचा पूर्णतः त्याग केला.

त्या काळातील परिस्थिती अत्यंत कठीण होती. घरात अनेकदा अन्नधान्य नसे, मुलांचे संगोपन करणे कठीण जाई, आजारपण आणि आर्थिक विवंचना कायम असत. बाबासाहेब विदेशात शिक्षण घेत असताना रमाबाई मुंबईत अत्यंत हालअपेष्टा सहन करत होत्या. संसार चालवण्यासाठी त्यांनी अनेक संकटांचा सामना केला. काही वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागत, तरीही त्यांनी बाबासाहेबांना कधीही शिक्षण सोडून परत येण्यास सांगितले नाही. त्यांच्या मनात बाबासाहेबांच्या ध्येयाबद्दल प्रचंड विश्वास होता. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाचे उद्धारकार्य बाबासाहेब करणार आहेत, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या वेदना मनात ठेवून बाबासाहेबांना सतत प्रेरणा दिली.

रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत आणि संयमी होते. त्यांना कोणत्याही प्रकारचा दिखाऊपणा आवडत नसे. साधी राहणी, परिश्रमशील वृत्ती आणि कुटुंबाविषयी अपार प्रेम हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. संकटांच्या काळात त्या देवभक्तीतून मानसिक बळ मिळवत असत. बाबासाहेब मात्र तर्कवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले होते. तरीही या दोघांमध्ये परस्पर आदर आणि समजूतदारपणा कायम राहिला. बाबासाहेबांनी अनेकदा रमाबाईंच्या सहनशीलतेचा आणि त्यागाचा उल्लेख अत्यंत आदराने केला आहे.

रमाबाईंच्या आयुष्यातील सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे त्यांच्या मुलांचे निधन. त्यांना एकूण पाच अपत्ये झाली; परंतु त्यापैकी बहुतेक मुलांचे लहान वयातच निधन झाले. दारिद्र्य, आरोग्याच्या समस्या आणि अपुऱ्या वैद्यकीय सुविधांमुळे त्यांना आपल्या लेकरांना गमवावे लागले. या दुःखाने रमाबाई आतून खचून गेल्या होत्या. मातृत्वाच्या असंख्य वेदना त्यांनी सहन केल्या. तरीही त्यांनी बाबासाहेबांच्या कार्यात कधी अडथळा आणला नाही. उलट त्यांच्या मानसिक स्थैर्याला आधार देण्याचा प्रयत्न केला. एका आईच्या आणि पत्नीच्या भूमिकेत त्यांनी केलेला त्याग अनमोल आहे.

बाबासाहेबांचे जीवन म्हणजे सततचा संघर्ष होता. अस्पृश्यतेविरुद्धचा लढा, शिक्षणासाठीचा संघर्ष, सामाजिक न्यायासाठीचे आंदोलन, कायद्याचा अभ्यास, राजकीय जबाबदाऱ्या आणि समाजजागृती या सर्व क्षेत्रांत बाबासाहेब कार्यरत होते. या प्रत्येक टप्प्यावर रमाबाई त्यांच्यासोबत सावलीसारख्या उभ्या राहिल्या. त्यांनी स्वतःला कधीही पुढे आणले नाही; परंतु बाबासाहेबांच्या यशामागे त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे होते. समाजपरिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी उभे राहण्यासाठी जी मानसिक ताकद लागते, ती रमाबाईंकडे होती.

महाड सत्याग्रह, चवदार तळ्याचा लढा, मंदिरप्रवेश आंदोलन, गोलमेज परिषद यांसारख्या ऐतिहासिक घटनांच्या काळात बाबासाहेबांचे जीवन अत्यंत व्यस्त आणि संघर्षमय होते. या काळात रमाबाई घराची जबाबदारी सांभाळत होत्या. आर्थिक ताण, सामाजिक दबाव आणि वैयक्तिक दुःख यांचा सामना करत त्यांनी बाबासाहेबांना मानसिक आधार दिला. एका अर्थाने बाबासाहेबांच्या सामाजिक क्रांतीला आवश्यक असलेली भावनिक शक्ती रमाबाईंकडूनच मिळत होती.

रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वात असलेली सहनशीलता आजच्या समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी कधीही स्वतःच्या दुःखाचे प्रदर्शन केले नाही. गरिबी, उपासमार, आजारपण, मुलांचे मृत्यू आणि सामाजिक अपमान या सर्व संकटांना त्यांनी धैर्याने तोंड दिले. त्यांच्या आयुष्याचा विचार केला तर लक्षात येते की त्या केवळ एका महान व्यक्तीच्या पत्नी नव्हत्या, तर स्वतःमध्येही एक महान व्यक्तिमत्त्व होत्या. त्यांचे योगदान शब्दांत मांडणे कठीण आहे.

रमाबाईंच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांची संवेदनशीलता. घरात कोणीही उपाशी राहू नये, गरजू व्यक्तींना मदत करावी, संकटात असलेल्या लोकांना धीर द्यावा, अशी त्यांची वृत्ती होती. अत्यंत गरिबीत राहूनही त्यांनी माणुसकी जपली. त्यांचे जीवन हे करुणा आणि सहअस्तित्वाचे उदाहरण होते. त्या काळातील दलित स्त्रियांच्या जीवनातील दुःख आणि संघर्ष रमाबाईंच्या जीवनातून स्पष्टपणे दिसून येतात.

स्त्रीशक्तीचा विचार करताना अनेकदा समाज केवळ प्रसिद्ध आणि सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या महिलांकडे पाहतो; परंतु घराच्या चार भिंतीत राहून समाजपरिवर्तनाच्या महान कार्याला आधार देणाऱ्या स्त्रियांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे असते. रमाबाई यांचे जीवन हे अशा स्त्रीशक्तीचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी कुटुंब, संसार आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना दाखवलेली संयमशीलता आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

बाबासाहेबांनी अनेकदा आपल्या लेखनात आणि भाषणांत रमाबाईंच्या त्यागाचा उल्लेख केला आहे. त्यांनी रमाबाईंना अत्यंत प्रेमाने रमा किंवा रामू असे संबोधले. बाबासाहेबांच्या आयुष्यात रमाबाईंचे स्थान किती महत्त्वाचे होते, हे त्यांच्या अनेक आठवणींमधून दिसून येते. बाबासाहेबांनी शिक्षणासाठी केलेल्या संघर्षात रमाबाईंचे सहकार्य नसते, तर कदाचित इतिहासाची दिशा वेगळी असती. कारण संघर्षाच्या काळात मानसिक आधार देणारी व्यक्तीच एखाद्याला मोठ्या ध्येयासाठी लढण्याची शक्ती देते.

रमाबाईंचे आरोग्य पुढे खालावत गेले. सततची गरिबी, कष्ट, अपुरी आहारव्यवस्था आणि मानसिक ताण यामुळे त्यांची प्रकृती ढासळली. बाबासाहेब त्या काळात अत्यंत व्यस्त होते. समाजकारण, राजकारण आणि कायदेविषयक कामांमध्ये त्यांचा वेळ जात होता. तरीही रमाबाईंच्या प्रकृतीबद्दल त्यांना सतत चिंता वाटत असे. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाबाईंचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने बाबासाहेब अत्यंत दुःखी झाले. त्यांनी आपल्या आयुष्यातील एक मोठा आधार गमावला होता.



रमाबाईंच्या निधनानंतर बाबासाहेब काही काळ अत्यंत खचून गेले होते. त्यांनी आपल्या आयुष्यातील संघर्षमय प्रवासात ज्यांच्यावर सर्वाधिक विश्वास ठेवला, ती व्यक्ती त्यांच्यापासून दूर गेली होती. बाबासाहेबांनी रमाबाईंच्या स्मरणार्थ अनेकदा भावनिक शब्दांत आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या जीवनातील त्यागाचे मोल त्यांनी मनापासून मान्य केले.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे जीवन नव्या पिढीसाठी प्रेरणेचा स्रोत आहे. त्यांचे जीवन आपल्याला सांगते की मोठ्या परिवर्तनामागे अनेक अनामिक त्याग असतात. समाजाला दिशा देणाऱ्या व्यक्तींच्या यशामागे त्यांच्या कुटुंबीयांचे, विशेषतः स्त्रियांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. रमाबाईंचे जीवन हे स्त्रीशक्तीच्या संयमी आणि समर्पित रूपाचे प्रतीक आहे.

समाजात आजही अनेक महिला विविध संकटांचा सामना करत आहेत. आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक दबाव आणि असमानता या समस्यांमध्येही त्या कुटुंब आणि समाजासाठी झटत आहेत. अशा वेळी रमाबाईंचे जीवन त्यांना संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देते. त्यांचा त्याग हा केवळ वैयक्तिक नव्हता; तो सामाजिक परिवर्तनासाठी दिलेला मूक वाटा होता.

रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे कार्य आणि योगदान समाजासमोर मांडणे आवश्यक आहे. अनेकदा इतिहासात मोठ्या व्यक्तींची नावे प्रसिद्ध होतात; परंतु त्यांच्या संघर्षात सहभागी असलेल्या व्यक्ती दुर्लक्षित राहतात. रमाबाईंचे जीवन हे अशाच दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्वाच्या योगदानाचे उदाहरण आहे. त्यांच्या स्मृती जतन करणे म्हणजे समाजातील त्याग, सहनशीलता आणि माणुसकीच्या मूल्यांना जपणे होय.

भारतीय स्त्रीच्या संघर्षमय जीवनाचे एक प्रभावी चित्र रमाबाईंच्या आयुष्यातून दिसते. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही धैर्य गमावले नाही. कुटुंबासाठी, पतीच्या ध्येयासाठी आणि मुलांसाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट केले. त्यांच्या जीवनात सुखाचे क्षण फार कमी होते; परंतु त्यांनी दुःखाला शरण न जाता त्यातून जगण्याची ताकद निर्माण केली.

रमाबाईंच्या जीवनाचा अभ्यास करताना त्या काळातील सामाजिक परिस्थितीही समजून घ्यावी लागते. दलित समाजावर होणारा अन्याय, अस्पृश्यतेमुळे मिळणारी अमानुष वागणूक, शिक्षणाचा अभाव, गरिबी आणि सामाजिक बहिष्कार या सगळ्या परिस्थितीत रमाबाई जगत होत्या. अशा काळात त्यांनी बाबासाहेबांना केवळ साथच दिली नाही, तर त्यांच्या ध्येयासाठी स्वतःचे जीवन वाहून घेतले.

आज अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांद्वारे रमाबाई आंबेडकर यांच्या स्मृती जपल्या जात आहेत. त्यांच्या नावाने महिला वसतिगृहे, शैक्षणिक संस्था, सामाजिक उपक्रम आणि स्मारके उभारण्यात आली आहेत. हे केवळ स्मरणाचे प्रतीक नाही, तर स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा प्रयत्न आहे. रमाबाईंच्या जीवनातून प्रेरणा घेऊन महिलांनी शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक जाणीव यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

रमाबाईंचे जीवन हे त्यागाच्या माध्यमातून इतिहास घडवणाऱ्या स्त्रीचे उदाहरण आहे. त्यांनी स्वतःचे आयुष्य प्रसिद्धीसाठी जगले नाही. त्यांना कोणत्याही पदाची किंवा सत्तेची अपेक्षा नव्हती. त्यांचे ध्येय केवळ कुटुंब आणि बाबासाहेबांच्या स्वप्नांना आधार देणे हेच होते. म्हणूनच त्यांचे योगदान अधिक मोठे वाटते. आजच्या भौतिकवादी युगात त्यांचे साधेपण आणि समर्पण समाजाला माणुसकीची जाणीव करून देते.

रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची मानसिक ताकद. संकटांच्या काळात अनेकजण खचून जातात; परंतु रमाबाई संकटांतही शांत राहिल्या. त्यांनी दुःख सहन केले, पण धैर्य सोडले नाही. त्यांच्या या वृत्तीमुळे बाबासाहेबांना समाजकार्यासाठी आवश्यक स्थैर्य मिळाले. त्यांचे जीवन हे मानसिक सामर्थ्याचे जिवंत उदाहरण आहे.

स्त्री-पुरुष समानतेच्या विचारांचा पाया मजबूत करण्यासाठी रमाबाईंचे जीवन अभ्यासणे आवश्यक आहे. स्त्रीचे योगदान केवळ घरापुरते मर्यादित नसते; ती समाजपरिवर्तनाची महत्त्वाची भागीदार असते. रमाबाई यांनी हे आपल्या आयुष्यातून सिद्ध केले. त्यांचे योगदान सामाजिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे, इतके मोठे आहे.

रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे विचार आणि जीवनमूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. त्याग, संयम, माणुसकी, सहकार्य आणि ध्येयनिष्ठा या मूल्यांची आज समाजाला अत्यंत आवश्यकता आहे. वाढती स्पर्धा, स्वार्थी वृत्ती आणि नातेसंबंधांमधील ताण यांच्या काळात रमाबाईंचे जीवन आपल्याला संवेदनशीलतेचा आणि नात्यांमधील विश्वासाचा संदेश देते.

रमाबाई आंबेडकर या नावात केवळ एका स्त्रीची ओळख नाही, तर संघर्षातून उभ्या राहिलेल्या भारतीय स्त्रीचे सामर्थ्य दडलेले आहे. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांच्याशी सामना केला. त्यांनी दुःखाला स्वीकारले, पण आशा सोडली नाही. त्यांच्या जीवनाचा विचार करताना मनात आदर आणि कृतज्ञतेची भावना निर्माण होते.

समाजातील प्रत्येक व्यक्तीने रमाबाईंच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी. कष्ट, त्याग आणि समर्पण यांच्यामुळेच मोठे परिवर्तन घडते, हा संदेश त्यांच्या आयुष्यातून मिळतो. आज महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा होत असली तरी त्यासाठी आवश्यक असलेली मूल्ये रमाबाईंच्या जीवनात स्पष्टपणे दिसतात. आत्मविश्वास, सहनशीलता आणि कुटुंबाविषयीची जबाबदारी यांचा सुंदर समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता.

रमाबाईंच्या स्मृतिदिनाचे महत्त्व केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास शाळा, महाविद्यालये आणि समाजसंस्थांमध्ये व्हायला हवा. त्यांच्या त्यागमय जीवनाची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचल्यास समाजात संवेदनशीलता आणि सामाजिक जाणीव वाढेल. बाबासाहेबांच्या कार्याची मुळे समजून घ्यायची असतील, तर रमाबाईंच्या त्यागाचे महत्त्व समजून घ्यावे लागेल.

आजच्या आधुनिक समाजात कुटुंबव्यवस्थेवर अनेक प्रकारची आव्हाने आहेत. अशा काळात रमाबाईंचे जीवन कुटुंबातील परस्पर सहकार्य, विश्वास आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित करते. त्यांनी बाबासाहेबांच्या ध्येयाला स्वतःचे ध्येय मानले. त्यांच्या संघर्षाला स्वतःचा संघर्ष समजले. म्हणूनच त्यांचे वैवाहिक जीवन केवळ संसार नव्हते, तर एका सामाजिक ध्येयासाठीची संयुक्त साधना होती.

रमाबाईंच्या आयुष्याकडे पाहताना आपल्याला स्त्रीच्या अदृश्य श्रमांचे महत्त्व समजते. घर सांभाळणे, मुलांची काळजी घेणे, संकटांना तोंड देणे आणि कुटुंबातील सदस्यांना मानसिक आधार देणे ही कामे समाज अनेकदा गृहीत धरतो. परंतु या कामांमुळेच मोठी स्वप्ने पूर्ण होतात. बाबासाहेबांच्या महान कार्यामागे रमाबाईंची हीच अदृश्य शक्ती कार्यरत होती.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजातील वंचित स्त्रीच्या संघर्षाचे प्रतीक आहे. त्यांनी प्रतिकूलतेतही स्वाभिमानाने जगण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या आयुष्यातील दुःख आणि त्याग समजून घेतल्याशिवाय बाबासाहेबांच्या संघर्षाचे पूर्ण चित्र समोर येत नाही. म्हणूनच रमाबाईंच्या स्मृतीचा सन्मान करणे म्हणजे सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासातील एका महत्त्वपूर्ण अध्यायाला आदर देणे होय.

रमाबाईंचे जीवन आपल्याला शिकवते की मोठेपणा हा केवळ प्रसिद्धीत नसतो, तर नि:स्वार्थी कार्यात असतो. त्यांनी स्वतःसाठी काही मागितले नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य इतरांसाठी जगण्यात गेले. म्हणूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक महान वाटते. त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी समाजासाठी प्रेरणादायी आहे.

आज महिलांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. तरीही अनेक महिलांना संघर्ष करावा लागतो. अशा वेळी रमाबाईंचे जीवन त्यांना मानसिक बळ देते. संकटांना सामोरे जाताना धैर्य आणि संयम कसे राखावे, हे त्यांच्या आयुष्यातून शिकण्यासारखे आहे.


रमाबाईंच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे स्मरण करताना केवळ श्रद्धांजली वाहून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या मूल्यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. समाजात समानता, माणुसकी आणि सहकार्याची भावना वाढवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत. बाबासाहेबांनी ज्या समतामूलक समाजाचे स्वप्न पाहिले, त्या स्वप्नाच्या उभारणीत रमाबाईंचा मूक पण महत्त्वपूर्ण वाटा होता.

भारतीय इतिहासातील अनेक स्त्रिया आपल्या त्यागामुळे आणि समर्पणामुळे स्मरणात राहिल्या आहेत. रमाबाई आंबेडकर यांचे नाव त्यामध्ये अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी आयुष्यभर संकटांचा सामना केला, पण कधीही कर्तव्यापासून मागे हटल्या नाहीत. त्यांचे जीवन हे प्रेरणेचा अखंड स्रोत आहे.

रमाबाईंच्या आयुष्यातील संघर्ष समजून घेतल्यास आपल्याला समाजातील विषमता आणि अन्यायाची जाणीव होते. त्याचबरोबर संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणाही मिळते. त्यांचे जीवन हे केवळ भूतकाळातील इतिहास नाही, तर वर्तमान आणि भविष्याला दिशा देणारा संदेश आहे.

२७ मे हा दिवस रमाबाईंच्या स्मृतीला अभिवादन करण्याचा दिवस आहे. हा दिवस आपल्याला त्याग, प्रेम, सहकार्य आणि माणुसकीची आठवण करून देतो. बाबासाहेबांच्या महान कार्याच्या पायाभरणीत रमाबाईंचे योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या शांत, संयमी आणि समर्पित जीवनामुळेच भारतीय समाजपरिवर्तनाच्या इतिहासाला नवी दिशा मिळाली.

रमाबाई आंबेडकर या भारतीय स्त्रीशक्तीचे एक तेजस्वी प्रतीक आहेत. त्यांचे जीवन जितके साधे होते, तितकेच ते महान होते. त्यांनी संकटांशी सामना करत समाजपरिवर्तनाच्या इतिहासात आपले अजरामर स्थान निर्माण केले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना त्यांच्या जीवनमूल्यांचा स्वीकार करण्याची प्रतिज्ञा प्रत्येकाने केली पाहिजे. कारण रमाईंचा त्याग, त्यांचे प्रेम आणि त्यांचे समर्पण हेच खऱ्या अर्थाने मानवतेचे आणि सामाजिक न्यायाचे अधिष्ठान आहे.



– डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जतन व संवर्धन आराखड्यातील सुरू असलेली कामे २५ जून पर्यंत पूर्ण करावी : जिल्हाधिकारी एस कार्तीकेयन

## जिल्हाधिकारी एस कार्तीकेयन यांनी केली विविध ठिकाणची पाहणी; जिल्ह्यात डिझेल पेट्रोल व गॅस पुरवठा सुरळीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत पडसाळ, देणगी कक्ष, अर्ध मंडप येथील पायऱ्या ही कामे २५ जून पर्यंत पूर्ण करावीत. तसेच पश्चिमद्वार चे काम तात्काळ सुरू करून आषाढी वारी पर्यंत पूर्ण करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी एस कार्तीकेयन यांनी दिल्या.





आज जिल्हाधिकारी एस कार्तीकेयन यांनी रिद्धी सिद्धी दर्शन मंडप, चंद्रभागा वाळवंट, सीसीटीव्ही कंट्रोल रूम, वाखरी पालखीतळ तसेच वाखरी ते पंढरपूर महामार्गाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या यावेळी त्यांच्या समवेत सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी एस कार्तीकेयन म्हणाले, अधिक मासातील एकादशीनिमित्त मंदिर समिती मार्फत दर्शन रांगेत भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, विश्रांती कक्ष, भोजन व्यवस्था, आरोग्य सुविधा, शौचालय, स्वच्छता आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. दर्शन रांगेतील भाविकांचे जलद व सुलभ दर्शन व्हावे यासाठी व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. दर्शन रांगेत घुसखोरी करणारे तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी प्रांताधिकारी यांनी दररोज सीसीटीव्हीची पाहणी करावी व यामध्ये दोषी आढळल्यास तात्काळ कारवाई करावी. दर्शन रांग व मंदिर परिसरात आरोग्य सुविधा केंद्र वाढविण्यात येणार.सद्यस्थितीत दर्शनी मंडपाचे काम सुरू असून आषाढी वारीत पावसामुळे चिखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यावर आवश्यक ती उपाययोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यात डिझेल पेट्रोल व गॅसची टंचाई नसून, पुरवठा सुरळीत सुरू आहे. आषाढी वारी कालावधीत देखील टंचाई निर्माण होणार नाही दक्षता घेण्यात आली आहे.आषाढी यात्रा कालावधीत पालखी मार्गावर ज्यादा जर्मनी हँगरची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. भाविकांना तात्काळ आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यासाठी टू व्हीलर म्बुलन्सची संख्या वाढविण्यात येणार आहे. दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये याची दक्षता घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात येणार आहेत. शहरातील अतिक्रमण तात्काळ काढून घ्यावीत. तसेच अतिक्रमण होणार नाही याबाबत कायमस्वरूपी नियोजन करण्यात यावे. मंदिर परिसरात फिरत्या विक्रेत्यांचा भाविकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याने सदर विक्रेत्यांवर तात्काळ कारवाई करावी. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून वाखरी ते पंढरपूर रस्त्याचे काम सुरू असून वारी अगोदर साईड पट्टी स्वच्छ करण्याचे तसेच दोन्ही पुलावरील मुरमीकरण व सपाटीकरण २५ जून पर्यंत पूर्ण करावे. नगरपालिकेने नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे तात्काळ दुरुस्त करावेत. खाद्यपदार्थांच्या दुकानाची वेळोवेळी तपासण्या करण्यासाठी अन्न औषध प्रशासनाकडून ज्यादा पथके नेमण्यात येणार आहेत. चंद्रभागा नदी पात्रातील होडी चालकांना भाविकांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी लाइफ जॅकेट देण्यात येणार आहेत. तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी कोणत्याही भाविकांनी पैसे देऊ नयेत. दर्शन निशुल्क असल्याबाबतचे फलक दर्शनी भागात लावावेत. अशा सूचनाही यावेळी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी दिल्या.

अधिकमासातील कमला एकादशीनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी चार ते पाच लाख वारकरी भाविक येण्याची शक्यता लक्षात घेऊन भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर समिती मार्फत करण्यात आलेल्या सोयी सुविधा बाबतची जिल्हाधिकारी यांनी माहिती घेतली.

यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी अधिक मासानिमित्त वारकरी भाविकांच्या सोयी सुविधेसाठी दर्शन रांग दर्शन मंडप येथे करण्यात आलेल्या सोयी सुविधांची माहिती दिली तसेच मंदिर जतन व संवर्धन आराखड्याअंतर्गत पूर्ण झालेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली.

# नीरा उजवा कालवा शाखा नं ४ व ५ ला तात्काळ पाणी सोडण्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आदेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/सोलापूर : सांगोला विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध व्हावे व पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर व्हावी यासाठी निरा उजवा कालव्याच्या शाखा नं ४ व ५ मधून पाण्याची आवर्तन तात्काळ सोडण्याची मागणी विधानसभा सदस्य डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आज मंत्रालय येथे जलसंपदा मंत्री मा.ना राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली असता मंत्री महोदयांनी तत्काळ फोनद्वारे पाणी सोडण्याचे आदेश दिले असून पुढील काही वेळात पाणी सुटणार असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आज मंत्रालयात जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेत मतदारसंघातील सध्याची स्थिती निदर्शनास आणून देताना वाकी शिवणे, चिंचोली, एखतपूर, अजनाळे, कमलापूर, शेळकेवाडी, सांगोला व परिसरातील लाभधारक शेतकऱ्यांना निरा उजवा कालव्यावर मोठी अपेक्षा असून या कालव्याच्या पाण्यावर डाळिंब, बोरे, आंबा, केळी अशा बागायती पिकांसह इतर पिके घेतली जातात. पाण्याअभावी दुष्काळासारखी स्थिती निर्माण झाली असून , सध्या कालव्यामध्ये अपेक्षित पाणी नसल्याने शेतकऱ्यांना दुबार पाणी मिळत नसल्याने पिकांना पाणी देणे कठीण झाले असल्याचे सांगितले. यामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून, पिके वाया

**आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश**

जाण्याची भीती निर्माण झाली आहे. विशेषतः कांदा, ज्वारी, डाळिंब इत्यादी पिके यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असून तात्काळ पाणी सोडण्याची विनंती मा.मंत्री महोदयांकडे केली. सदर बाबीचा तात्काळ विचार करून मंत्री महोदयांनी तत्काळ फोन लावत पाणी सोडण्याचे आदेश दिले. यामुळे पाणी सुटण्याचा मार्ग मोकळा झाला असून यावर तात्काळ दखल घेतल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी जलसंपदा मंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील व ग्रामविकास मंत्री मा.ना.जयकुमार गोरे यांचे आभार मानले. सदरचे निरा उजवा कालव्याचे पाणी सुटण्याचे आदेश झाल्याने शेतकऱ्यांना समाधान व्यक्त करत आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचे आभार मानले.

# अक्कलकोटच्या इतिहासात प्रथमच डेरेदार झाडांचे पुन:प्रत्यारोपण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट शहराच्या इतिहासात प्रथमच डेरेदार झाडांचे पुनः प्रत्यारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा अभिनव आणि स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या पर्यावरणपूरक विकसित अक्कलकोट शहर या उद्दिष्टाला अनुसरून नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम प्रत्यक्षात साकार झाला असून शहरभरातून या निर्णयाचे स्वागत होत आहे.

सध्या एमएसईबी चौक ते बायपास रोड या रस्त्याचे काम सुरू आहे. या कामादरम्यान रस्त्यालगतची जुन्या पिंपळ-वडाची डेरेदार झाडे तोडली जात असल्याचे नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्या निदर्शनास आले. त्यावेळी त्यांनी तत्काळ गाडी थांबवून संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि झाडे पूर्णपणे तोडण्याऐवजी त्यांचे पुनः प्रत्यारोपण करण्याचे आदेश दिले.

**आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या पर्यावरणपूरक विकसित अक्कलकोट शहर या उद्दिष्टाला अनुसरून नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांचा अभिनव उपक्रम**

नगराध्यक्षांच्या सूचनेनुसार अंदाजे १२ ते १३ डेरेदार झाडे क्रेनच्या सहाय्याने काळजीपूर्वक उपटून शहरातील विविध भागात स्थलांतरित करण्यात आली. ज्या ठिकाणी झाडांची योग्य वाढ होईल आणि पर्यावरणाला अधिक फायदा होईल अशा ठिकाणी ही झाडे पुन्हा लावण्यात आली आहेत.

विशेष म्हणजे, शहरातील रस्त्यांच्या कडेला असलेली इतर डेरेदार झाडे देखील भविष्यात अशाच पद्धतीने स्थलांतरित करून त्यांचे संवर्धन करण्यात येणार असल्याच्या सूचना नगराध्यक्ष मिलन दादा कल्याणशेट्टी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अक्कलकोट नगरपरिषदचे मुख्याधिकारी रमाकांत डाके साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विकासकामांसोबत पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही तितक्याच गांभीर्याने पार पाडण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला असून, अक्कलकोट शहरासाठी हा उपक्रम एक आदर्श ठरत आहे.

# बकरी ईद : त्याग, करुणा आणि माणुसकीचा खरा अर्थ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय समाजजीवनातील सण-उत्सव ही केवळ आनंदाची क्षणे नसतात तर ते समाजाच्या नैतिक मूल्यांची, सांस्कृतिक परंपरांची आणि मानवी नात्यांची पुनःप्रत्ययकारी स्मृती असतात. प्रत्येक सण माणसाला काहीतरी शिकवून जातो. काही सण आनंद शिकवतात, काही कृतज्ञता, काही एकात्मता, तर काही आत्म परीक्षण. बकरी ईद, ज्याला ईद-उल-अजहा असेही म्हटले जाते, हा असाच एक सण आहे, जो केवळ धार्मिक विधींचा दिवस नसून त्याग, समर्पण, करुणा आणि सामाजिक जबाबदारी यांचे गहिरे तत्त्वज्ञान आपल्या समोर ठेवतो. आजच्या काळात सणांचे स्वरूप अनेकदा बाह्य दिखाऊपणाकडे झुकताना दिसते. उत्सवांचा अर्थ अनेकदा कपडे, सजावट, भोजन आणि औपचारिक शुभेच्छांपुरता मर्यादित होतो. अशा वेळी बकरी ईद आपल्याला आठवण करून देते की खरा सण बाह्य प्रदर्शनात नसतो; तो अंतर्मनातील मूल्यांच्या जागृतीत असतो.

बकरी ईदची प्रेरणा इस्लामी परंपरेतील एका अत्यंत अर्थपूर्ण प्रसंगातून मिळते. परमेश्वराच्या आदेशापुढे संपूर्ण समर्पण दाखवत इब्राहिम यांनी आपल्या सर्वांत प्रिय गोष्टीचाही त्याग करण्याची तयारी दाखवली. ही कथा केवळ धार्मिक आख्यायिका म्हणून पाहण्याची नाही. तिच्या गाभ्यात एक अत्यंत मानवी आणि सार्वकालिक प्रश्न आहे, माणूस स्वतःच्या स्वार्थापेक्षा मोठ्या मूल्यांसाठी किती तयार आहे? आज समाजासमोर याच प्रश्नाचे वेगळ्या रूपात पुनरागमन होत आहे. आपण विकासाच्या, आधुनिकतेच्या आणि प्रगतीच्या भाषा बोलतो, पण त्यागाची भाषा किती बोलतो? आपण अधिकारांची मागणी करतो, पण जबाबदारीचे भान किती ठेवतो? आपण सुखाच्या मागे धावतो; पण दुसऱ्याच्या दुःखात किती थांबतो?

बकरी ईदचा खरा संदेश याच ठिकाणी अधिक तेजस्वी होतो. या सणाचा केंद्रबिंदू म्हणजे 'कुर्बानी'. पण कुर्बानीचा अर्थ केवळ एका धार्मिक विधीपुरता मर्यादित ठेवणे हा त्याचा संकुचित अर्थ ठरेल. कुर्बानी म्हणजे आपल्या अहंकाराचा त्याग, लोभाचा त्याग, अन्यायकारक वृत्तीचा त्याग, स्वार्थाचा त्याग. दुसऱ्याच्या हितासाठी स्वतःच्या काही गोष्टी बाजूला ठेवण्याची तयारी म्हणजे कुर्बानी. आज समाजात तणाव वाढत आहेत. धर्म, जात, भाषा, प्रदेश, विचारधारा प्रत्येक ठिकाणी भिंती उभ्या राहताना दिसतात. संवाद कमी होतो आहे, संशय वाढतो आहे, सहजीवनाचे मूल्य कमकुवत होत आहे. अशा वेळी बकरी ईदचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो. कारण हा सण सांगतो की श्रद्धा ही केवळ वैयक्तिक भक्ती नसते तर ती सामाजिक करुणेशी जोडलेली असली पाहिजे.





**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

या सणातील आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे वाटणीची भावना. कुर्बानीतून मिळालेल्या अन्नाचा काही भाग गरीब, गरजू आणि वंचितांपर्यंत पोहोचवण्याची परंपरा ही केवळ धार्मिक आचारसंहिता नाही; ती सामाजिक न्यायाची जिवंत जाणीव आहे. आज जगभर संपत्ती वाढत आहे, पण विषमताही वाढत आहे. शहरांच्या आकाशाला भिडणाऱ्या इमारतींच्या सावलीत उपाशी पोटांची संख्या कमी झालेली नाही. विकासाच्या भाषणांबरोबरच बेरोजगारी, महागाई, असुरक्षितता आणि उपेक्षा यांचीही कठोर वास्तवता आहे. अशा वेळी बकरी ईद आपल्याला सांगते की उत्सव तेव्हाच पूर्ण होतो, जेव्हा आनंदाच्या ताटात दुसऱ्याचाही हक्क असतो. ही भावना अत्यंत महत्त्वाची आहे. कारण समाज केवळ कायद्यांनी टिकत नाही, तो संवेदनांनी टिकतो. संविधान समानतेचा मार्ग दाखवते, पण करुणा त्या मार्गावर चालण्याची नैतिक ताकद देते.

आजच्या सार्वजनिक जीवनात संवेदनशीलतेचा अभाव तीव्रतेने जाणवतो. राजकारणात कटुता वाढते आहे, सार्वजनिक चर्चेत सभ्यता कमी होते आहे, सामाजिक माध्यमांवर अपमानाची भाषा सामान्य झाली आहे. दुसऱ्याच्या वेदनेकडे पाहण्याची क्षमता कमी होत चालली आहे. अशा वातावरणात बकरी ईदचा संदेश केवळ एका समुदायापुरता मर्यादित राहत नाही, तो संपूर्ण समाजासाठी नैतिक धडा ठरतो. हा सण आपल्याला सांगतो धर्माचा खरा अर्थ विभाजनात नाही, तर माणुसकीत आहे. भारतीय समाजाची खरी ताकद त्याच्या विविधतेत आहे. इथे बकरी ईद, दिवाळी, ख्रिसमस, बुद्ध पौर्णिमा हे सर्व सण केवळ कॅलेंडरवरचे दिवस नसतात; ते परस्पर सन्मान आणि सहअस्तित्वाच्या संस्कृतीचे प्रतीक असतात. या भूमीची ताकद एकरूपतेत नाही; ती अनेकतेतून उभ्या राहिलेल्या ऐक्यात आहे. म्हणूनच बकरी ईदच्या निमित्ताने एक गोष्ट विशेषत्वाने लक्षात ठेवावी लागेल, धर्माचे बाह्य रूप समजणे सोपे असते; पण त्यातील मानवी गाभा समजून घेणे अधिक आवश्यक असते.

बकरी ईदचा मानवी गाभा स्पष्ट आहे: त्याग करा, वाटा, दुसऱ्याच्या दुःखात सहभागी व्हा आणि परमेश्वरापुढे नम्र राहा. आजच्या पिढीसमोर उपभोगवादाचे प्रचंड आकर्षण आहे. यशाची व्याख्या अनेकदा पैसा, प्रतिष्ठा आणि भौतिक साधनांमध्ये अडकलेली दिसते. स्पर्धा आहे, धावपळ आहे, तुलना आहे, असुरक्षितता आहे. अशा वेळी बकरी ईद एक वेगळाच प्रश्न विचारते, तुमच्याकडे किती आहे हे महत्त्वाचे नाही, तुम्ही किती वाटू शकता हे अधिक महत्त्वाचे आहे. हीच खरी नैतिक उंची आहे. या सणाच्या निमित्ताने कुटुंब, नातेवाईक, शेजारी, मित्र यांच्यात भेटीगाठी होतात. एकमेकांना शुभेच्छा दिल्या जातात. पण या भेटीगाठींच्या मागे एक मोठा सामाजिक अर्थ दडलेला आहे, नात्यांचे पुनरुज्जीवन. आजच्या काळात माणूस डिजिटलरीत्या जोडलेला आहे, पण भावनिकदृष्ट्या अनेकदा तुटलेला आहे. घरात माणसे आहेत, पण संवाद कमी आहे. समाजात गर्दी आहे, पण जवळीक कमी आहे. अशा वेळी सण हे नात्यांना पुन्हा उब देणारे प्रसंग ठरतात.

बकरी ईद आपल्याला हेही शिकवते की श्रद्धा आणि विवेक एकमेकांचे विरोधक नाहीत. खरी श्रद्धा माणसाला अधिक विनम्र, अधिक न्यायप्रिय आणि अधिक करुणामय बनवते. जर धर्म माणसाला दुसऱ्याचा द्वेष शिकवत असेल, तर तो धर्माचा आत्मा नसून त्याचे विकृत रूप आहे. आज जगाला सर्वांत जास्त गरज कोणत्या गोष्टीची आहे, तर ती आहे परस्पर विश्वासाची. धर्माच्या नावावर निर्माण होणारे तणाव, समाजमाध्यमांवर पसरवला जाणारा द्वेष, अफवांमधून पेटणारी अस्वस्थता, या सगळ्यांच्या काळात बकरी ईदचा संदेश अधिकच अर्थपूर्ण ठरतो. कारण हा सण आठवण करून देतो की खरी धार्मिकता माणसाला इतरांपासून दूर नेत नाही; ती त्याला अधिक जवळ आणते. या निमित्ताने समाजाने स्वतःलाही काही प्रश्न विचारायला हवेत.

आपल्या आनंदात दुसऱ्याचा वाटा आहे का? आपल्या श्रद्धेत करुणा आहे का? आपल्या समृद्धीत सामाजिक जबाबदारी आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचे आपल्या धर्मात माणूस आहे का? हे प्रश्न केवळ तत्त्वज्ञानाचे नाहीत; ते लोकशाही समाजाच्या नैतिक आरोग्याशी संबंधित आहेत. बकरी ईदचा उत्सव मिरवणुकीत, सजावटीत किंवा औपचारिक शुभेच्छांत संपता कामा नये. तो आपल्या वर्तनात उतरला पाहिजे. जर या दिवशी आपण एखाद्या गरजवंताची मदत केली, एखाद्या उपाशी पोटी अन्न पोहोचवले, एखाद्या दुखावलेल्या नात्याला पुन्हा जुळवले, एखाद्या पूर्वग्रहाला मनातून काढून टाकले तरच या सणाचा आत्मा खऱ्या अर्थाने जिवंत राहील.

शेवटी, बकरी ईदचा संदेश अत्यंत साधा आहे, पण अत्यंत गहिरा आहे. मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही. करुणेपेक्षा मोठी प्रार्थना नाही आणि वाटणीपेक्षा मोठा उत्सव नाही. बकरी ईदच्या या पवित्र निमित्ताने आपण असा संकल्प करूया की श्रद्धा असू द्या, पण त्यात नम्रता असू द्या, समृद्धी असू द्या, पण त्यात वाटणी असू द्या, मतभेद असू द्या, पण वैर नको. कारण शेवटी समाज महान होतो तो त्याच्या संपत्तीने नाही, तर त्याच्या संवेदनांनी. बकरी ईदच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यागाची जाणीव, करुणेची ऊब आणि माणुसकीचा प्रकाश आपल्या समाजात अधिक दृढ होत राहो, हीच मंगलकामना.

# सर्व कंपन्यांनी सोलापूर जिल्ह्याला पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा पुरवठा सुरळीतपणे ठेवणे आवश्यक

## जिल्हाधिकारी एस.कार्तीकेयन; जिल्हा प्रशासनाच्या परवानगीशिवाय पेट्रोल पंप विक्रेत्यावर कोणत्याही प्रकारची बंधने घालू नयेत

**■ पेट्रोल व डिझेल मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने नागरिकांनी साठा करू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये**
**■ कंपन्यांकडून जिल्ह्यासाठी पाच ते सात दिवसाचा बफर स्टॉक, तर नियमित पुरवठाही सुरळीत असल्याचे सांगण्यात आले.**
**■ जिल्ह्यातील पेट्रोल विक्रेते यांच्याही अडचणी जाणून घेतल्या**
**■ वजन, मापे उपायुक्तांनी जिल्ह्यातील पेट्रोल पंपाचे क्लाबिरेशन(पेट्रोल पंप मशीनची अचूकता तपासणी) व्यवस्थितपणे करावे**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्याला पेट्रोल, डिझेल व गॅस पुरवठा करणाऱ्या बीपीसीएल, एचपीसीएल व आयओसीएल या सर्व कंपन्यांनी सोला-पूर जिल्ह्याला प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणात बफर स्टॉक उपलब्ध ठेवावा. तसेच दैनंदिन मागणीप्रमाणे जिल्ह्याच्या शहरी व ग्रामीण भागात इंधनपुरवठा सुरळीतपणे ठेवणे आवश्यक असल्याचे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन दिले.





जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात (दि. २५)पेट्रोल, डिझेल व गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या प्रतिनिधी समवेत आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी कार्तीकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक श्री. रघुकुमार, बीप-ीसीएलचे वरिष्ठ अधिकारी प्रवीण यादव, संजयकुमार, एचपीसीएलचे सागर चव्हाण, निकीत रेड्डी व आयओसीएलचे सागर गौतम, तन्मय आनंद, आयएमसील कंपनीचे नंदकिशोर अडसुळे, अनिल करीर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन पुढे म्हणाले की, काही पेट्रोल विक्रेत्याकडून कंपनीने दररोज काही मर्यादितच पेट्रोल, डिझेल विक्री करावी असे बंधने घातल्या बाबतच्या तक्रारी आलेल्या आहेत. तरी सर्व संबंधित कंपन्यांनी जिल्हा प्रशासनाच्या परवानगीशिवाय पेट्रोल विक्रेत्यावर इंधन विक्रीचे कोणत्याही प्रकारची बंधने घालू नयेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊ शकते. यापुढे अशा कोणत्याही प्रकारच्या तक्रारी येऊ नये, तसेच इंधनपुरवठा सोला-पूर शहरासह ग्रामीण भागात ही सुरळीतपणे सुरू राहील याबाबत दक्षता घ्यावी, असे त्यांनी सुचित केले.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी पेट्रोल डिझेल पुरवठ्याच्या अनुषंगाने काळजी करू नये जिल्ह्यात मुबलक प्रमाणात इंधन साठा उपलब्ध असून कंपन्यांना दररोज नियमित मागणीप्रमाणे पेट्रोल डिझेल उपलब्ध केले जात आहे. विशेषत: जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील नागरिकांनी पेट्रोल, डिझेलचा अतिरिक्त साठा करून ठेवू नये, असेही आवाहन जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी केले आहे. तसेच उछ्रः गॅस पुरवठ्यात ही कंपनीने मागणीप्रम ाणे वाढ करावी.

प्रारंभी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांच्याकडून सर्व पेट्रोल डिझेल व गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या कंपन्यांची रोजची पेट्रोल व डिझेलची मागणी व त्याप्रमाणे कशा पद्धतीने पुरवठा होत आहे याविषयी माहिती घेण्यात आली. तसेच गॅस पुरवठा कशा पद्धतीने केला जात आहे व त्यात मोठ्या प्रमाणात वाढ करावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच कंपन्यांकडून किमान सात दिवसाचा पेट्रोल व डिझेलचा बफर स्टॉक ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले तसेच सोलापूर शहर व ग्रामीण भागात मागणीप्रम ाणे पेट्रोल व डिझेल पुरवठा रोजचा रोज उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले.

जिल्ह्यातील सर्व डीलर व विक्रेते यांच्या पेट्रोल व डिझेल च्या अनुषंगाने अडीअडचणी जाऊन घेतल्या. व ग्राहकांना इंधन पुरवठा सुरळीत करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. सरडे यांनी काही पेट्रोल पंप चालकाकडून ड्रम व मोठ्या प्रमाणात एकाच व्यक्तीला इंधन पुरवठा होत आहे, अशा तक्रारी ग्रामीण भागातून येत आहेत. तसेच अक्कलकोट करमाळा बार्शी या तालुक्यात इंधनपुरवठा विस्कळीत झाल्याबाबत ही तक्रारी येत असल्याने या भागा-तील पेट्रोल पंप सुरू राहतील या दृष्टीने कंपन्यांनी त्या ठिकाणच्या विक्रेत्यांना पुरवठा करावा अशा सूचना त्यांनी दिल्या.

**आज जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्याकडून पंढरपूर येथील एका पेट्रोल पंपाची तपासणी**

सर्व तहसीलदार यांनी कोणत्याही पेट्रोल पंपावर इंधनाची कृत्रिम टंचाई होणार नाही याची दक्षता घ्यावी

जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलच्या अनाधिकृत साठवणुकीसह काळाबाजार रोखण्यासाठी तसेच काही नागरिकाकडून पेट्रोल विक्रेत्याकडून पेट्रोल डिझेलचे शॉर्ट सेलिंग सुरू असल्याची तक्रारी आलेल्या होता, त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी आज पंढरपूर शहरातील एका पेट्रोल पंपावर तपासणी केली. या ठिकाणी सर्व बाबी व्यवस्थित असल्याचे आढळून आले.

सर्व प्रांताधिकारी, तह-सीलदार यांनी तालुक्यातील कोणत्याही पेट्रोल पंपावर कृत्रिम टंचाई होणार नाही या दृष्टीने लक्ष ठेवण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या पेट्रोल पंपाची तपासणी करावी. व ग्राहकांना सुरळीत इंधन पुरवठा होईल यासाठी दक्ष राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी दिले.

**तालुकानिहाय संयुक्त भरारी पथक स्थापन–**

पेट्रोल पंपांवर डिझेल खरेदीसाठी रांगा लागल्याने काळाबाजार होण्याची शक्यता लक्षात घेऊन तालुका निहाय संयुक्त भरारी पथक स्थापन करण्यात आले आहेत.

संयुक्त पथकात तहसी-लदार तथा तालुका दंडाधिकारी समन्वयक म्हणून, पोलिस निरीक्षक कायदा व सुव्यवस्था प्रमुख म्हणून, तर निरीक्षक अधिकारी/नायब तहसीलदार तांत्रिक तपासणी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. याशिवाय मंडळ अधिकारी, पुरवठा निरीक्षक/सहा. महसूल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांचा समावेश करण्यात आला आहे.

वजन, मापे उपायुक्तांनी जिल्ह्यातील पेट्रोल पंपाचे क्लाबिरेशन(अचूकता तपासणी) व्यवस्थितपणे करावे

वजन व मापे कार्यालयाकडून जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपाचे क्लाबिरेशन योग्य पद्धतीने केलेले आहे की नाही याची तपासणी करावी. ज्या पेट्रोल पंचाचे क्लबिरेशन योग्य नाही ते दुरुस्त करून योग्य प्रमाणात करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी उपायुक्त वजन व मापे यांना आज दिले.

---

## बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने ८५ वा वर्धापन दिन आणि त्यागमूर्ती माता रमाई यांच्या ९१ व्या स्मृतिदिनाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : (रामदास धो. गमरे) बौद्धजन पंचायत समिति केंद्रीय कार्यालय यांच्या वतीने ८५ वा वर्धापन दिन सोमवार दि. २५ मे २०२६ रोजी सायंकाळी ठीक ७:०० वाजता व महासुर्याची सावली, कोट्यवधीची माऊली, त्यागमूर्ती माता रमाई याचा ९१ वा स्मृतिदिन बुधवार २७ मे २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजता डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई १२ येथे बौद्धजन पंचायत समितीचे सभापती आनंदराज आंबेडकर यांच्या अधिपत्याखाली आयोजन करण्यात आले आहे.

सदर दोन्ही कार्यक्रमास प्रमुख वक्ते उपसभापती विन-ोद मोरे, कार्यसम्राट कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, बौद्धजन पंचायत समिती सहकारी पतपेढीचे अध्यक्ष व विश्वस्त किशोर मोरे, सरचिटणीस राजेश घाडगे, खजिनदार नागसेन गमरे, व्यवस्थापन मंडळ, मध्यवर्ती कमिटी, महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडणार आहेत. तरी दोन्ही दिवस आयोजित केलेल्या कार्यक्रमास सर्व व्यवस्थापक मंडळाचे सदस्य, मध्यवर्ती महिला मंडळ, विविध समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, शाखांचे कार्यकर्ते, संस्कार समितीचे सर्व उपासक, उपासिका, बौद्धाचार्य, बौद्धाचार्या आदींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने काढण्यात आलेल्या परिपत्रकात सरचिटणीस राजेश घाडगे यांनी केले आहे.

---

## सांगोला तालुक्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान; आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांची कृषिमंत्र्यांकडे तात्काळ मदतीची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/जि. सोलापूर : सांगोला तालुक्यातील अनेक गावांमध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या संदर्भात सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आम दार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आज मुंबई येथे कृषिमंत्री दत्तात्रय (मामा) भरणे यांची भेट घेत तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून प्रभावित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई आणि आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

आज मंत्रालय येथे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी कृषी मंत्री दत्तात्रय मामा भरणे यांची भेट घेत सांगितले की सांगोला तालुक्यातील चोपडी, नाझरे, बलवडी, सोमेवाडी, हा-तीद, उदनवाडी, गौडवाडी आदी गावांमध्ये आणि आसपासच्या परिसरातील डाळिंब, द्राक्ष, पेरू, भाजीपाला व इतर पिकांवर गारपिटी आणि अवकाळी पा-वसाचा मोठा परिणाम झाला असून गारपिटीमुळे फळबागांच्या संरक्षक जाळ्या खराब झाल्या असून झाडे उन्मळली आहेत आणि उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून या नुकत्याच झालेल्या वादळी वाऱ्यांसह अवकाळी पावसामुळे अनेक गावांतील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तरी संबंधित महसूल व कृषी विभागामार्फत तात्काळ पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व आर्थिक मदत मंजूर करण्यात यावी.

यावेळी कृषी मंत्री डॉ.दत्त-ात्रय मामा भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना देवून शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत देण्याचे सकारात्मक आश्वासन दिले.

यावेळी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी कृषी मंत्री दत्तात्रय मामा भरणे यांनी लवकरात लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे मान्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

---

## कळंब येथे लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने विविध मागण्यांसाठी निवेदन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : लोक जनशक्ती पार्टी (रामविलास) यांच्या वतीने शेतकरी, विद्यार्थी, निराधार व भूमिहीन नागरिकांच्या विविध मागण्यांसाठी उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय कळंब यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात खरीप हंगाम २०२६ साठी शेतकऱ्यांना खते व बी-बियाणे पावसाळ्यापूर्वी मोफत वाटप करावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच संजय गांधी निराधार, श्रावणबाळ सेवा निवृत्ती वेतन, इंदिरा गांधी योजना, ज्येष्ठ नागरिक निवृत्ती व विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान व मानधन त्वरित अदा करावे, असे नमूद केले.

दहावी-बारावी पास झालेल्या विद्यार्थ्यांना तहसील कार्यालयाकडील जात, उत्पन्न, रहिवासी व नॉन क्रिम ीलेअर प्रमाणपत्र लवकर लवकर वितरित करावेत. एससी प्रवर्गातील जात प्रमाणपत्रासाठी पुरावे काही प्रम ाणात शिथिल करून मंडळ अधिकारी पंचनामा व रक्त नात्यातील जात प्रम ाणपत्र ग्राह्य धरावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच

अतिक्रमित जमीन भूमिहीनांच्या नावे करून मालकी हक्कात नोंद घ्यावी, विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र तलाठी व ग्रामसेवकांमार्फत देण्याची सोय करावी आणि दोन वर्षांपासून प्रलंबित असलेली महाडीबीटी समाज कल्याण विभागाची विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तात्काळ द्यावी, आदी मागण्या निवेदनात केल्या आहेत.

मागण्या पूर्ण न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला.

यावेळी लोक जनशक्ती पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ अण्णा गायकवाड, तालुकाध्यक्ष भारत कदम, शहराध्यक्ष नागेश धीरे, मुकेश गायकवाड, बाबा टोपे, बालाजी वाघम ारे, देवदास चिलवंत, मीना शिंदे, मीना बनसोडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

---

**भाविकांना अत्याधुनिक दर्जाच्या सोयी-सुविधा**

**जुलैमध्ये महालक्ष्मी व व्यंकटेश मंदिरे दर्शनासाठी खुली होणार : गहिनीनाथ महाराज औसेकर**

# आषाढी यात्रेत दि.१६ जुलैपासून २४ तास दर्शन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सन २०२६ मधील आषाढी एकादशी शनिवार, दि.२५ जुलै रोजी साजरी होत असून पहाटे २.२० वाजता राज्याचे मुख्यमंत्री तसेच मानाचे वारकरी यांच्या शुभहस्ते सपत्न-ीक श्रींची शासकीय महापूजा संपन्न होणार आहे. आषाढी यात्रा कालावधी दि.१५ ते २९ जुलै असा असून, या कालावधीत श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिराशी संबंधित प्रथा, परंपरा व भाविकांना देण्यात येणाऱ्या विविध सोयी-सुविधांचा आढावा घेण्यात आला.

दि.१६ जुलै रोजी श्रींचा पलंग काढून भाविकांसाठी २४ तास दर्शन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

**मंदिर समितीची सभा संपन्न**

मंदिर समितीची सभा दि.२६ मे रोजी दुपारी १.३० वाजता भक्तनिवास येथे श्री औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचे पालन करून ही सभा आयोजित करण्यात आली होती. सभेस शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ड. माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रविणकुम ार घम, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, पुरातत्व विभागाचे विलास वाहणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीनिवास गुजरे, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, जतन-संवर्धन कामाचे ठेकेदार प्रतिनिधी तसेच मंदिर समितीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

सभेमध्ये आषाढी यात्रा नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यामध्ये शासकीय महापूजा, २४ तास दर्शन व्यवस्था, दर्शनरांग नियोजन, लाईव्ह दर्शन, सुरक्षा व्यवस्था, निवास व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, अन्नछत्र तसेच इतर अनुषंगिक सोयी-सुविधांबाबत चर्चा करण्यात आली.

तसेच प्रतिवर्षीप्रमाणे श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार देण्याचे निश्चित करण्यात आले. जतन व संवर्धन कामांच्या आढाव्यामध्ये श्री महालक्ष्मी मंदिर व श्री व्यंकटेश मंदिर येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा करून माहे जुलैमध्ये भाविकांसाठी मंदिरे दर्शनास खुली करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय मंदिराचे मूळ स्वरूप कायम राखण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याचेही ठरविण्यात आले.

सभेत मंदिर समितीच्या सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली. पर्यावरण संवर्धनासाठी म हाराष्ट्रामध्ये राबविण्यात येणाऱ्या जगद्गुरू अभंग गाथावन व श्री ज्ञानेश्वरी तपोवन या अभियानांम ध्ये श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीचा सहभाग नोंदविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच मंदिर समितीच्या जमिनी जास्तीत जास्त ३ ते ५ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्याबाबत अधिनियमामध्ये सु-धारणा करण्याचा प्रस्ताव शास-नास सादर करण्याचे ठरले.

याशिवाय भक्तनिवास येथील ५ बेड व ८ बेडच्या खोल्या वातानुकूलित करणे, २४ तास गरम पाणी उपलब्ध व्हावे यासाठी हिट पंप यंत्रणेचे अद्यावतीकरण करणे, तसेच पंढरपूर शहर व परिसरातील अधिकृत मठांमध्ये शौचालय बांधकाम करणे आदी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.